ISSN: 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 8 | Issue - 4 | January - 2019
REVIEW OF RESEARCH
International Online Multidisciplinary Journal
UGC APPROVED Journal No.: 48514

# मानवी हक्क व दुर्बल घटक



डॉ. उत्तम छाजू राठोड

डॉ. उत्तम छाजू राठोड

सहयोगी प्राध्यापक, नूतन महाविद्यालय, सेलू, ता. सेलू, जि. परभणी.

प्रस्तावना : जगाच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात एक महत्वाचे बिरूद म्हणून मानवी हक्क संकल्पनेचा उदय झालेला दिसून येतो. तथापि दुसऱ्या महायुद्धानंतर उदयाला आलेल्या मानवी हक्क संकल्पनेने राष्ट्र–राज्याच्या सीमा ओलांडून हक्कविषयक चर्चा विश्वाला ..........

Editor - In - Chief - Ashok Yakkaldevi

Scanned with OKEN Scanner

International Online Multidisciplinary Journal
REVIEW OF RESEARCH
ISSN NO: 2249-894X

Review of Research (ROR) Journal is an Online International Multidisciplinary Research Journal, published nthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind ·r reviewed referred by members of the Editorial Board. Readers will include investigator in universities, research titutes government and industry with research interest in the general subjects.


## OUR CHIEF EDITORS

India



Ashok Yakkaldevi

Iran



Bijan Goodarzi

Bucharest



Ecaterina

Sri-lanka



Kamani Perera

## Associate Editors



Dr. T. Manichander



Sanjeev Kumar Mishra


## Associated and Indexed, India

- MENDALEY
- GOOGLE SCHOLAR
- CITULIKE
- ENDNOTE
- ZOTERO
- DRJI

Scanned with OKEN Scanner

REVIEW OF RESEARCH

IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# मानवी हक्क व दुर्बल घटक


डॉ. उत्तम छाजू राठोड
सहयोगी प्राध्यापक, नूतन महाविद्यालय, सेलू, ता. सेलू, जि. परभणी.

जगाच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात एक महत्वाचे बिरूद म्हणून मानवी हक्क संकल्पनेचा उदय झालेला दिस येतो. तथापि दुसऱ्या महायुद्धानंतर उदयाला आलेल्या मानवी हक्क संकल्पनेने राष्ट्र-राज्याच्या सीमा ओलां हक्कविषयक चर्चा विश्वाला वेगळे परिणाम दिले. आज राष्ट्र राज्याच्या कार्यक्षेत्रातील व्यक्तीला जन्मतःच काही हक प्राप्त होतात, ही संकल्पना मान्य झालेली आहे. आज राष्ट्र-राज्याच्या कार्यक्षेत्रातील व्यक्तीच्या मानवी हक्कांबरो आपण कोणत्याही, राज्यहीन, विस्थापित व निर्वासितांच्या हक्कांची चर्चा करून शकतो आणि म्हणूनच मानवी हक्कां उल्लंघन हा कळीचा मुद्दा बनला आहे. आज एखाद्या राज्यात किंवा राष्ट्रात मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्या राष्ट्रीयत्वच नाही, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर टिकेला सामोरे जावे लागते.

## मानवी हक्क म्हणजे काय?

कोणत्याही राष्ट्राची प्रतिष्ठा त्याने आपल्या नागरिकांना दिलेल्या हक्कांवरून ओळखली जाते. माणसाला माण म्हणून समाजामध्ये वावरण्यासाठी आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी आणि आपली सर्वांगीण प्रगती विकास साधण्यासाठी मानवी हक्कांची गरज असते. थोडक्यात असे की, व्यक्तीला कोणत्याही अडथळ्याविना स्वतः विकास साध्य करता यावा यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे म्हणजे हक्क होय. याचाच अर्थ असा की, मानव हक्कांची संकल्पना राज्याच्या सीमेपलीकडे जाऊन मानवाच्या वैश्विक हक्काची परिभाषा मांडते. मानवी हक्क संकल्पने गृहितक असे आहे की, सर्व मनुष्य मात्र हे समान आहेत, म्हणून त्यांना प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्यासाठी काही समान हक्क उपलब्ध असले पाहिजेत. कोणतीही जात, वंश, भाषा, वांशिकता, धर्म, संस्कृती आणि राष्ट्रीयता यामध्ये भेदभाव न करता स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी काही हक्क उपलब्ध असले पाहिजेत.

जगातील सर्व मानव समान आहेत व जगातील सर्व मनुष्यांना काही समान मूलभूत गरजा असतात या दोन पायाभूत गृहितकांवर मानवी हक्कांची संकल्पना उभी आहे. मानवाच्या प्रागैतिहासिक काळापासून हक्कविषयक संकल्पनेचे संकेत मिळतात. ज्यामध्ये पश्चिम युरोपातील उरचा नम्मू (उरचा राजा) याने स्थापन केलेली कायदेसंहिता (बी.सी.२०५०), प्राचीन भारतात अशोकच्या काळात नागरी हक्कांची पायाभूत तत्वे निर्माण करण्यात आली. ज्याने कलिंगच्या युद्धानंतर बौद्धधर्माचा स्वीकार करून अहिंसा, सहिष्णुता, पालक, गुरुजन सर्वांप्रती आदर, मैत्रीभाव या तत्वांचा अंगीकार केला. वेद, बायबल, कुराण यामध्येही लोकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सांगितल्या आहेत. आधुनिक काळात अमेरिका व फ्रेंच राज्यक्रांतीने मानवाच्या अभिन्न अशा नैसर्गिक हक्कांची क्रांतिकारी संकल्पना मांडलेली आढळते.



ज्यामध्ये गुलामगिरीची प्रथा नष्ट करण्यामध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेने जोर धरल्याने दक्षिण अमेरिका, आफ्रिका व आशियाई खंडातील अनेक वसाहती स्वतंत्र बनल्या. या बहुतांश राष्ट्रांनी आपल्या राष्ट्रीय



Scanned with OKEN Scanner

संविधानामध्ये लोकशाही शासनप्रणालीचा स्वीकार करून आपल्या नागरिकांना काही मूलभूत हक्क बहाल केले. यातूनच मानवी हक्कांचा पाया रचला गेला.

भारतीय संविधानातील मानवी हक्कः

भारतीय घटनेच्या सरनाम्यातच मानवी हक्कांची आधारशिला असणाऱ्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय याप्रती निःसंदिग्ध स्वरूपात बांधिलकी व्यक्त करण्यात आलेली आहे. घटनेच्या विभाग ३ मधील १२ ते ३५ ही कलमे व्यक्तींच्या मूलभूत हक्कांशी संबंधित आहेत. ज्यामध्ये भारतीय सहा प्रकारचे हक्क भारतीय नागरिकांना प्रदान केलेले आहेत.

राष्ट्रीय मानवी हक्क आयोग कायदा १९९३ मध्ये स्थापन करण्यात आला. ज्यात नागरीकांच्या जीवित, स्वातंत्र्य, समता व प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याच्या मानवी हक्कांचे योग्य रीतीने संरक्षण केले जाते की नाही हे बघण्यासाठी आयोग महत्वपूर्ण भूमिका निभावतो.

भारतातील मानविधकारासंबंधी कळीचे मुद्देः

भारतीय स्थानिक व आंतरराष्ट्रीय प्रक्रियेचा अभ्यास केल्यास मानवाधिकारांचे उल्लंघन फार मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. त्यातील महत्वपूर्ण घटक पुढीलप्रमाणेः

१) पोलीस, सुरक्षा व लष्करी दले यांच्या दमनकारी कारवायाः

अनेकवेळा शासकीय यंत्रणाकडून निरपराध व्यक्ती व गटांना लक्ष केले जाते. समाजातील विघातक कृतींचा बीमोड करण्यासाठी केवळ लष्करी उपाययोजनांवर भर दिल्यामुळे सामान्य जनजीवन दुरापास्त होते. परिणामी शासकीय यंत्रणा दमनकारी बनून मानवी हक्कांच्या उल्लंघनास जबाबदार असते. अलीकडे अनेक घटनांतून पुढे आलेल्या खोट्या पोलीस चकमकी मानवी हक्कांचे उल्लंघन करताना दिसतात. प्रभावी प्रसार माध्यमे व न्यायव्यवस्था असतानादेखील प्रशासन मानवी हक्कांची अर्थपूर्ण हमी देण्यास अपयशी ठरले आहे.

२) कैद्यांचा छळः

कैद्यांच्या हक्कासंबंधी वेगळा कायदा अजूनही स्वीकारण्यात आलेला नाही. परिणामी असलेली यंत्रणा कैद्यांशी मनमानी व अमानवी स्वरूपाची वर्तणूक देताना आढळून येते.

३) फाशीची शिक्षाः

मानवी हक्कांमध्ये प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याचा अधिकार बहाल केलेला आहे. त्यामुळे अमनेस्टी इंटरनॅशनल या संस्थेच्या मते फाशीची शिक्षा ही मानवी हक्कांच्या कल्पनेशी विसंगत ठरते.

४) स्त्रीविरोधी हिंसाः

स्त्री व पुरुष हे भारतीय घटनेनुसार समान असताना देखील खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रात स्त्रीला समानतेची वागणूक दिली जात नाही. त्यामुळेच स्त्री-भ्रूण हत्या, बालविवाह, लैंगिक छळ-अत्याचार, बलात्कार, हुंडाबळी यांसारख्या समस्यांना सामोरे जावेच लागते. आधुनिक भारताने जागतिकीकरणाची भूमिका स्वीकारली असली, तरी स्त्रीकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन बदलेला नाही.

५) दुर्बल घटकांवरील अत्याचारः

भारतीय घटनेने जरी जात, धर्म, लिंग, अस्पृश्यता यांसारख्या सर्व बाबी कालबाह्य ठरवलेल्या असल्या तरी आजही आधुनिक भारतात जातीवास्तव्याचे नकारात्मक, विषम व शोषणकारी परिणामच भोगावे लागत आहेत. ग्रामीण भागात अत्याचार, अन्याय व हालअपेष्टांना सामोरे जावे लागत आहे. ही स्थिती भारत, आज महासत्तेकडे झुकलेला असतानादेखील आजही भारतातील संपूर्ण राज्यात दिसून येते. महाष्ट्रासारख्या पुरोगामी प्रबोधनाची पार्श्वभूमी असलेल्या

राज्यात तीव्र पडसाद दिसून येतात. याचे जिवंत उदाहरण म्हणजे खैरलांजी येथे झालेले प्रकरण होय. ही केवळ सामाजिक, आर्थिक वंचितांच्याच वाटेला आलेली दिसते. त्यातही शिक्षणाचा अभाव, कनिष्ठ प्रतीचे काम, बेकारी, दारिद्र्य यामुळे प्रतिष्ठापूर्वक जीवन जगणे अशक्य झालेले आहे. प्रत्येक क्षेत्रात दुय्यमत्व वाट्याला आल्यामुळे स्त्रिया लैंगिक शोषणाच्या बळी पडताना दिसत आहेत.

६) बालमजुरीः

बालमजुरी ही एक भारतीय समाजातील महत्वाची समस्या बनलेली आहे. दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता या समस्यांच्या चक्रातून बालमजुरीची समस्या उद्भवलेली आढळते. कुटुंबात उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे व मुलांना शिक्षण देणेही शक्य नसल्यामुळे मुलांना बालमजुरीवर पाठविले जाते. सुशिक्षित समाजही स्वस्त दराने कामगार उपलब्ध होतो म्हणून या प्रथेला खतपाणी घालतो. ही बालमजुरीची प्रथा मानवी अधिकाराचे उल्लंघन करणारी ठरते. तरी आजही यासारख्या समस्या कायदे असूनही पूर्णपणे संपल्याचे दिसत नाही. आजही ही समस्या तीव्र स्वरूपाचीच असल्याचे दिसून येते.

भारताने जागतिकीकरणाच्या रेट्यात पाऊल टाकल्यानंतर जवळपास सर्वच क्षेत्रावर त्याचा कमी-अधिक प्रमाणावर प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यातच सक्तीच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने झटकलेली आहे. डॉ. आनंद तेलतुंबडे यांच्या मते शिक्षणाच्या बाबतीत जागतिकीकरणाच्या चळवळीच्या काळात मोठ्या प्रमाणावर खाजगीकरण, व्यापारीकरण व अभिजातीकरण झालेले आहे. विशेष महत्वाचे म्हणजे खाजगी संस्थांमध्ये जागतिकीरणाच्या कृतीमुळे दलितांना आरक्षणसुद्धा नाकारण्यात आलेले आहे. त्याची झळ अन्य जातीतल्या उतरंडीवरील दुर्बल घटकांना बसेल हे निश्चितच यातून स्पष्ट होते.

१९९० च्या दशकात जमातवादाची समस्या पुढे आली ज्यामध्ये मुंबईची दंगल (१९९२-९३), गुजरातमधील नरसंहार (२००२) यांसारख्या घटनांनी अल्पसंख्याकांच्या हक्कांचा प्रश्न ऐरणीवर आणलेला आहे. महाराष्ट्रातील खैरलांजी हत्याकांडाने अत्याचाराची कटू वास्तवता उघडकीस आणलेली आहे.

सारांशः

आजही मानवी हक्क आयोगाने अनुसूचित जाती-जमाती यांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जे-जे कायदे केले ते सर्व फोल ठरताना दिसून येतात. जोपर्यंत समाजातील दारिद्र्य, विषमता, अत्याचार, शोषण, धार्मिक व सामाजिक अंधश्रद्धा संपणार नाहीत. तोपर्यंत मानवी हक्कांचे उल्लंघन अधिक ठळकपणे व राजरोसपणे आपल्या निदर्शनास येताना दिसेल, यात तीळमात्र शंका नाही. यासाठी शासनाने त्या गंभीर समस्याकडे तेवढ्याच तीव्रतेने बघण्याची गरज आहे व त्यासंबंधी तसे कठोर निर्णय घेण्याची गरज आहे. केवळ घटनात्मक तरतुदी करून त्यांच्या हक्कांचे संरक्षण होणार नाही, तर त्यासाठी विकास कार्यक्रमांचीही अंमलबजावणी केली जावी नाही तर मिळालेल्या स्वातंत्र्याला काहीही अर्थ उरणार नाही.

संदर्भः

१) कदम ये. ना., '२०व्या शतकातील जगाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, १४ मे २००३, पृ. २०३.
२) प्रा. कऱ्हाडे, 'जागतिकीकरण व भारतासमोरील आव्हाने', डायमंड प्रकाशन, पुणे, १४ एप्रिल २००७, पृ. ७४.
३) कुलकर्णी अ. ना., 'भारतातील स्थानीक स्वशासन', विद्या प्रकाशन, नागपूर, ४ मे २००४, पृ.१०३.
४) संपादक मंडळ, एम.पी.एस.सी. राज्यसेवा परीक्षा मार्गदर्शन, पुणे, मे २००५, पृ. ८३.



Scanned with OKEN Scanner